परिपत्रक -४

**रयत शिक्षण संस्था, सातारा**
आस्थापना माध्यमिक विभाग
**दिनांक - ७/०४/२०१७**

सर्व शाखाप्रमुख,
प्राथमिक, माध्यमिक, माध्यमिक विद्यालयांशी संलग्नित सर्व उच्च माध्यमिक विद्यालये,
कनिष्ठ महाविद्यालये, रयत शिक्षण संस्था.

यांना------

**विषय :- राज्यस्तरीय शिक्षक साहित्य संमेलनात आपल्या संस्थेतील उपक्रमशील शिक्षकांच्या सहभागाबाबत...**

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई विभागीय केंद्र, औरंगाबाद, शिक्षण विकास संघ यांच्या वतीने राज्यस्तरीय शिक्षक साहित्य समेलनाचे आयोजन औरंगाबाद येथील कै.वसंतराव काळे साहित्यनगरी रुक्मिणी सभागृह, एमजीएम परिसर येथे शनिवार दि.१५ व रविवार दि.१६ एप्रिल २०१७ रोजी संमेलन संपन्न होणार आहे.

अभ्यासक्रमाशी संबंधित विषयांवर, शैक्षणिक विषयांवर लिहिणारे (शिक्षणातील नवीन प्रवाह, शैक्षणिक समस्या, इत्यादी) आणि ललित साहित्य (कथा, कविता, नाटक, कादंबऱ्या इत्यादी) अशा तिन्ही अंगांनी लेखन करणारे प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक या तिन्ही स्तरांवर काम करणारे अनेक शिक्षक महाराष्ट्रात आहेत. अशा शिक्षकांना एकत्र येऊन आपले विचार, कल्पना आणि अनुभव यांची देवाण-घेवाण करता यावी, अशा लिहित्या शिक्षकांना साहित्यिक म्हणून ओळख मिळावी व त्यांच्याकडून अधिकाधिक साहित्य निर्मिती व्हावी, हा या संमेलन आयोजनाचा प्रमुख उद्देश आहे.

या करिता आपले शाळेतील साहित्यप्रेमी व उपक्रमशील शिक्षकांना या संमेलनास सहभागी होणसाठी प्रोत्साहित करावे व जास्तीत जास्त शिक्षक याचा लाभ घेतील असे नियोजन करावे.

रयत शिक्षण संस्था सातारा

**सहसचिव,(माध्य.)**
**रयत शिक्षण संस्था, सातारा.**

सोबत - साहित्य संमेलन पत्रिका
प्रत माहितीसाठी
१) सचिव, रयत शिक्षण संस्था, सातारा.
२) सहसचिव(उ.शि.), रयत शिक्षण संस्था, सातारा.
प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी रवाना -
१) इन्स्पेक्टर, रयत शिक्षण संस्था, मध्य विभाग, सातारा.
२) इन्स्पेक्टर, रयत शिक्षण संस्था, दक्षिण विभाग, सांगली.
३) इन्स्पेक्टर, रयत शिक्षण संस्था, उत्तर विभाग, अहमदनगर.
४) इन्स्पेक्टर, रयत शिक्षण संस्था, पश्चिम विभाग, पुणे.
५) इन्स्पेक्टर, रयत शिक्षण संस्था, रायगड विभाग, कामोठे.(पनवेल)

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-विभागीय केंद्र औरंगाबाद
शिक्षण विकास मंच आयोजित

## राज्यस्तरीय शिक्षक साहित्य संमेलन (वर्ष दुसरे)

### शिक्षकांना आवाहन

इयत्ता पहिली ते बारावीपर्यंत शिकवणाऱ्या आणि ललित किंवा शैक्षणिक विषयावर लेखन करणाऱ्या शिक्षकांना या संमेलनात सहभागी होता येईल.

संमेलनात सहभागी होण्यासाठी कोणतेही शुल्क नाही. परंतु निवास, भोजन व्यवस्था व स्मरणिका आणि संमेलनात देण्यात येणाऱ्या साहित्यासाठी
**नाममात्र २०० रु. प्रतिनिधी शुल्क**

ज्या शिक्षकांना या संमेलनात प्रतिनिधी म्हणून सहभागी होण्याची इच्छा असेल त्यांनी खालील लिंक वर जाऊन ऑनलाईन नोंदणी करावी. तसेच संमेलन स्थळी ऐनवेळी देखिल नोंदणी करता येईल.

-लिंक : http://bit.ly/ShikshakSahityaForm

# वाचूया...
# लिहूया...
# वाचन संस्कृती
# वाढवूया...

## संयोजन समिती

**निमंत्रक :** खा.सुप्रिया सुळे
**संमेलनाध्यक्ष :** मा. बालाजी मदन इंगळे
**स्वागताध्यक्ष :** मा. आ.विक्रम काळे

**संयोजक**
डॉ. वसंत काळपांडे
बसंती रॉय
दत्ता बाळसराफ

**विभागीय केंद्र औरंगाबाद :**
**अध्यक्ष :** नंदकिशोर कागलीवाल
**कोषाध्यक्ष :** सचिन मुळे
**सचिव :** मुकुंद भोगले

**स्वागत समिती :**
अंकुशराव कदम, डॉ.श्रीरंग देशपांडे, विजय कान्हेकर, सुहास तेंडुलकर, डॉ.अपर्णा कक्कड, डॉ.रेखा शेळके, डॉ. नरेंद्र काळे, डॉ.दीपा क्षीरसागर

**कार्यवाह :** नीलेश राऊत

**संयोजन समिती :**
डॉ. कैलास अंभुरे, डॉ.वीरा राठोड, महेश अचिंतलवार, रवींद्र केसकर, डॉ.गणेश मोहिते, डॉ.संदीप शिसोदे, रेणुका कड, सुबोध जाधव,विनोद सिनकर, रुपेश मोरे, राजेंद्र वाळके, दिलीप सूर्यवंशी, एच. बी.सोमवंशी, प्रा.माधव सूर्यवंशी, श्रीकांत देशपांडे, गणेश घुले, मंगेश निरंतर, त्रिशूल कुलकर्णी, श्रीराम पोतदार, संतोष लोमटे, आशा देशपांडे, प्रा.समाधान इंगळे, निखिल भालेराव, एन.सी.कवडे, पी.जी.राजपूत, पी.जी.डोनगावे, बबन माळी, सोनालिका नागभिडे, अतुल बडवे, विश्वनाथ ससे, ज्ञानेश्वर आसोलकर, संदीप भदाने

**राज्यस्तरीय शिक्षक साहित्य संमेलन (वर्ष दुसरे)**
**अधिक माहितीसाठी संपर्क :**
संपर्क कार्यालय : द्वारा, अभ्युदय फाऊंडेशन, कासलीवाल सुवर्णयोग, व्यंकटेश मंगल कार्यालयासमोर, सुतगिरणी रोड, गारखेडा परिसर, औरंगाबाद - 431 005
दूरध्वनी : (0240) 2351779
E-mail : shikshaksahitya@gmail.com
Facebook Page : @shikshaksahityasamelan

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई-विभागीय केंद्र औरंगाबाद
शिक्षण विकास मंच आयोजित

# राज्यस्तरीय शिक्षक साहित्य संमेलन (वर्ष दुसरे)

**शनिवार, १५ व रविवार, १६ एप्रिल २०१७**
**वसंतराव काळे स्मृती साहित्य नगरी,**
**रुख्मिणी सभागृह, एमजीएम परिसर,**
**सेव्हन हिल्स, औरंगाबाद**



निमंत्रक
**खा. सुप्रिया सुळे**
कार्याध्यक्ष
यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई



संमेलन अध्यक्ष
**बालाजी मदन इंगळे**
प्रसिद्ध शिक्षक साहित्यिक



स्वागताध्यक्ष
**आ. विक्रम काळे**
मराठवाडा शिक्षक मतदारसंघ

विशेष सहकार्य
**महात्मा गांधी मिशन**

यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई
विभागीय केंद्र औरंगाबाद,
व शिक्षण विकास मंच आयोजित

## संमेलनाच्या निमित्ताने

सर्व साहित्यप्रेमी शिक्षकांना...
स.न.वि.वि.
औरंगाबाद येथे राज्यस्तरीय शिक्षक साहित्य संमेलनाचे आयोजन प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आलेले आहे. अभ्यासक्रमाशी संबंधित विषयांवर, शैक्षणिक विषयांवर लिहिणारे (शिक्षणातील नवीन प्रवाह, शैक्षणिक समस्या इ.) आणि ललित साहित्य (कथा, कविता, नाटक, कादंबऱ्या इ.) अशा तिन्ही अंगांनी लेखन करणारे प्राथमिक, माध्यमिक आणि उच्च माध्यमिक या तिन्ही स्तरांवर काम करणारे अनेक शिक्षक महाराष्ट्रात आहेत. अशा शिक्षकांना एकत्र येऊन आपले विचार, कल्पना आणि अनुभव यांची देवाण-घेवाण करता यावी, अशा लिहित्या शिक्षकांना साहित्यिक म्हणून ओळख मिळावी व त्यांच्याकडून अधिकाधिक साहित्य निर्मिती व्हावी, हा या संमेलन आयोजनाचा प्रमुख उद्देश आहे.

यापुर्वी महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या परिषद) आणि शिक्षण विकास मंच, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने २०१२ साली पुण्यात पहिले राज्यस्तरीय शिक्षकांचे साहित्य संमेलन आयोजित करण्यात आलेले होते. याचबरोबर वाचन संस्कृती वाढावी व विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, यासाठी हे संमेलन निश्चितच दिशादर्शक ठरेल.

पहिल्या शिक्षक साहित्य संमेलनात केवळ प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षकांचाच सहभाग घेण्यात आला होता. यावेळी उच्च माध्यमिक स्तरावरील शिक्षकांची मागणी लक्षात घेऊन दुसऱ्या शिक्षक साहित्य संमेलनात त्यांनासुद्धा सहभागी करून घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मी सर्व साहित्यप्रेमी शिक्षकांना आवाहन करते की मोठ्या संख्येने संमेलनास उपस्थित राहून संमेलन यशस्वी करावे ही विनंती.

- खा. सुप्रिया सुळे

# संमेलन वेळापत्रक

## शनिवार, दि. १५ एप्रिल २०१७

**उद्घाटन सत्र**

सकाळी ८.०० ते १०.०० - नोंदणी व चहा-नाष्टा

सकाळी ९.०० ते १०.०० - ग्रंथ दिंडी

सकाळी १०.०० ते दुपारी १२.३० -उद्घाटन सोहळा

दुपारी १२.३० ते १.३० - भोजन

**सत्र पहिले**

दुपारी १.३० ते ३.०० - 'माझ्या लेखन प्रेरणा'
(नामवंत शिक्षक साहित्यिकांची मुलाखत)

दुपारी ३.०० ते ४.३० -परिसंवाद क्र. १
'सोशल मिडियावरील शिक्षकांचे सृजनशील लेखन'

दुपारी ४.३० ते ५.०० - चहापान

**सत्र दुसरे**

संध्या. ५.०० ते ७.३० - 'शब्द झुल्यावर'
निमंत्रितांचे कवी संमेलन

संध्या. ७.३० ते रात्री ८.३० - भोजन

**सत्र तिसरे**

रात्रौ ८.३० ते १०.००
कलाविष्कार - सांस्कृतिक कार्यक्रम

## रविवार दि. १६ एप्रिल २०१७

**सत्र पहिले**

सकाळी ८.०० ते ९.०० - चहा-नाश्ता

सकाळी ९.०० ते १०.०० - कथाकथन

**सत्र दुसरे**

सकाळी १०.०० ते ११.३० - परिसंवाद क्र. २
'पाठ्यक्रमातील साहित्याची निवड आणि निकष'

सकाळी ११.३० ते १.०० - परिसंवाद क्र. ३
'वाचन संस्कृतीशी मुलांना जोडण्यासाठी शिक्षकांची भूमिका'

दुपारी १.०० ते २.०० - भोजन

**सत्र तिसरे**

दुपारी २.०० ते ३.०० - सांस्कृतिक कार्यक्रम

**समारोप सत्र**

दुपारी ३.०० ते ४.३० - समारोप सोहळा